## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ ची जबानी

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | - | प्रकाश पंढरी काळे |
| माझे वय | - | ५५ वर्षे, |
| व्यवसाय | - | शेती |
| राहणार | - | मुंडगाव ता. अकोट जि. अकोला. |

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती.के.जे.महाजन यांचे मार्फत.**

**१.** घटना दि. २६.१०.२०१५ रोजी घडली होती. त्यादिवशी मी माझा मित्र रमेश रोठे याचेसोबत दुचाकीवर लामकाणी येथे मयतासाठी गेलो होतो. तेथुन आम्ही ७.३० ते ७.४५ च्या सुमारास मुंडगाव येथे येण्यासाठी निघालो होतो. त्यावेळी गाडी मी चालवित होतो. रमेश रोठे पाठीमागे बसलेले होते. आम्ही येत असतांना कॉर्नरवर एक दुचाकी गाडी सरळ येवुन धडक दिली. सदर दुचाकीवर तिघेजन बसलेले होते. सदर दुचाकी एकदम झुयझप आली व आमच्या दुचाकीला धडक दिली. त्या दुचाकीचा क्रमांक एमएच ३० एके ४०५१ असा होता. सदर दुचाकी मुंडगावकडुन लामकाणीच्या दिशेने येत होती. सदर गाडी येतांना दिसल्यावर मी माझी गाडी रस्त्याच्या खाली घेतली. तरी सुध्दा सदर गाडी माझ्या गाडीला येवुन धडकली होती. धडक मारल्यामुळे मी व रमेश रोठे खाली गवतात पडलो. माझ्या उजव्या पायाला व उजव्या हाताच्या करंगळीला मार लागला होता. तसेच रमेश रोठे यांच्या उजव्या पायाला देखील मार लागला होता. त्यानंतर मी माझ्या मुलाला व रमेश रोठेच्या मुलाला तेथे फोनकरुन बोलावले. त्यानंतर माझ्या मुलाने मला व रमेश रोठेला मुंडगाव येथे आणले. तसेच ज्या गाडीने आम्हाला धडक दिली त्याच्या चालकाला देखील मुंडगाव येथे आणले होते. सदर दुचाकी चालकाने त्याचे नाव संतोष मोहन वानखडे रा पिंपळखुटा ता. अकोट जि. अकोला असल्याचे आम्हाला सांगीतले. आम्ही त्याला आम्हाला दवाखान्यात ने असे सांगीतले होते. मात्र त्यानंतर तो मुंडगाव मधुन गायब झाला. त्यानंतर मी, रमेश रोठे व आमच्या दोघांची मुले अकोट येथे रिपोर्ट देण्यास आलो होतो. त्यानंतर मी रिपोर्ट दिला. (सरकारी वकीलांनी साक्षदारास रिपोर्ट व छापील एफआयआर दाखविला.) आता मला दाखविलेला रिपोर्ट व छापील एफआयआर तेच असुन त्यावर माइया सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (सदर रिपोर्ट व छापील एफआयआरला **निशाणी पी१ व पी२** देण्यात येते.) नंतर पोलीसांनी आम्हाला अकोट येथील सरकारी दवाखान्यात पाठविले होते. तेथे डॉक्टरांनी आम्हाला तपासुन अकोला येथे पाठविले होते. घटनास्थळ माझ्या मुलाने पोलीसांना दाखविले होते. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी करुन माझे बयाण घेतले होते. सदर अपघात समोरच्या गाडी चालकाच्या चुकीमुळे झाला होता. सदर गाडी चालक न्यायालयात

हजर आहे.

## उलटपास आरोपीतर्फे वकील श्री.ए.एस.वैराळे यांचे मार्फत.

२. माझ्याकडे गाडी चालविण्याचा परवाना आहे. मी तो न्यायालयात दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की मी ज्याठिकाणी अपघात झाल्याचे सांगत आहे त्याठिकाणी वळणावर समोरुन येणारी गाडी लवकर दिसत नाही. हे म्हणणे खरे नाही की समोरच्या गाडीचा लाईट माझ्या डोळयावर पडल्याने मला समोरचे काही दिसले नाही. दुचाकी क्र. एचएच ३० एके ४०५१ ही गाडी भरधाव वेगात लामकाणीकडे निघुन गेली होती हा माझ्या बयाणातील मजकुर चुकीचा आहे. तसा मजकुर माझ्या बयाणात का लिहला आहे त्याचे कारण मी सांगत शेत नाही. समोरुन येणाऱ्या दुचाकीवर तिघेजन बसलेले होते हे मी पोलीसांना बयाण देतवेळी सांगीतले होते. सदर बाब माझ्या बयाणात का नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. समोरुन येतांना दिसल्यावर मी माझी गाडी रस्त्याच्या खाली घेतली ही बाब मी पोलीसांना बयाण देतांना सांगीतली होती. सदर बाब माझ्या बयाणात का नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. मी माझ्या मुलाला व रमेश रोठेच्या मुलाला फोनकरुन बोलावले होते ही बाब रिपोर्ट देतांना सांगीतली नव्हती. घटनेनंतर माझ्या मुलाने व रमेश रोठेच्या मुलाने आम्हाला मुंडगाव येथे आणल्याचे मी रिपोर्ट देतांना व बयाणात सांगीतली होती. सदर बाब माझे रिपोर्ट व बयाणात का नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. तसेच दुचाकी चालकाने त्याचे नाव संतोष मोहन वानखडे रा. पिंपळखुटा असल्याचे आम्हाला सांगीतल्याचे मी पोलीसांना रिपोर्ट देतांना व बयाण देतांना सांगीतले होते. सदर बाब माझे रिपोर्ट व बयाणात का नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. तसेच आरोपीला मुंडगाव येथे नेल्याचे व नंतर आरोपी मुंडगाव येथुन गायब झाल्याचे मी पोलीसांना रिपोर्ट व बयाण देतांना सांगीतले होते. सदर बाब माझे रिपोर्ट व बयाणात का नाही याचे कारण मी सांगु शकत नाही.

३. माझ्या दुचाकीचा साधारण वेग २५ कि.मी. प्रती तास होता. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळावरील वळणावर २० ते २५ कि.मी.प्रती तास पेक्षा जास्त वेग असल्यास वळण घेता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की माझी गाडी भरधाव वेगात होती. हे म्हणणे खरे नाही की वळण न घेता आल्याने माझी गाडी रोडच्या खाली पडली. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मला मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने माझ्या गाडीला धडक दिल्याचे आणि त्यामुळे मला व माझ्या मित्राला मार लागल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की आम्ही आरोपीला मुंडगाव येथे घेवुन गेल्याचे मी खोटे सांगत आहे.

४. हे म्हणणे खरे नाही की लामकाणी ते मुंडगाव जाणाऱ्या रस्त्यावर घटनास्थळावर डाव्या बाजुला दाट झुडपे आहेत. हे म्हणणे खरे नाही की आम्हाला जी गाडी क्रॉस झाली ती वेगळीच होती. हे म्हणणे खरे नाही की केवळ लोकांनी आरोपीचे नाव सांगीतले

म्हणुन मी आरोपीविरुध्द रिपोर्ट दिला. हे म्हणणे खरे नाही की खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHANUPRATAP B. CHOUHAN Date: 2023.08.18 18:18:41 +0530

Digitally signed by BHANUPRATAP B. CHOUHAN Date: 2023.08.18 18:18:32 +0530

दि. १८/८/२०२३. भानुप्रताप ब. चौहान
अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट नं.१